**देखभाल दुरुस्ती / विशेष दुरुस्ती अंदाजपत्रके सादर करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: प्रमा-२०१३/(प्र.क्र.७८५/१३)/सिंव्य(कामे)**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १६/०९/२०२१

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक प्रमा २०१३/(७८५/१३/सिंव्य (कामे), दिनांक ०१/०१/२०१५.
२) शासन निर्णय क्रमांक देवदु २०१५/ (८३६/१५)/ सिंव्य (कामे), दि.१७.११.२०१६.
३) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/(२७/२०१६)/लपा-२, दि.२६.०५.२०१७.
४) शासन निर्णय क्रमांक २०१७/(५६६/१७)/सिंव्य (कामे), दि.३१.०८.२०१८.
५) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/(५५१/१७)/सिंव्य (कामे), दि.२७.११.२०१८.
६) शासन निर्णय क्रमांक प्रमा २०१३/प्र.क्र.७८५/१३/सिंव्य (कामे), दि.०१/०८/२०१९

**प्रस्तावना :-**

जलसंपदा विभागातील पूर्ण झालेले प्रकल्प सिंचन व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत केले जातात. त्यानंतर प्रकल्पांची नियमित देखभाल दुरूस्तीची कामे महामंडळाला प्राप्त होणा-या पाणीपट्टीमधून करण्यात येतात. विशेष दुरुस्ती व विस्तार सुधारणा अंतर्गत कामे योजनांतर्गत निधीमधून हाती घेतली जातात. अशा कामांना योजनांतर्गत (Plan) लेखाशिर्षाखाली शासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. प्राप्त परिस्थितीत प्रकल्पांची संख्या, वयोमान व उपलब्ध निधी या बाबीचा विचार केल्यास विशेष दुरुस्ती, विस्तार व सुधारणा अंतर्गत समाविष्ट करावयाच्या कामांच्या प्रस्तावामध्ये सुसूत्रता यावी व प्रस्ताव सादरीकरणातील सध्याचा विस्कळीतपणा दूर व्हावा यासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या.

तद्नंतर या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करताना क्षेत्रिय कार्यालयांना आलेल्या अडचणींच्या अनुषंगाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करून सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतर मा. राज्यपाल यांचे पत्र दि.१४.०८.२००९ नुसार जलसंपदा विभागाने नियोजन विभागाशी सल्लामसलत करून विशेष दुरूस्ती आणि विस्तार व सुधारणाबाबत संदर्भ क्र.६ अन्वये धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने देखभाल दुरूस्ती / विशेष दुरूस्तीच्या प्रस्तावित अंदाजपत्रकाबाबत काही अतिरिक्त मार्गदर्शक सूचना देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन परिपत्रक :-**

देखभाल दुरूस्ती / विशेष दुरूस्तीच्या प्रस्तावित अंदाजपत्रकाबाबत मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे :-

१) बांधकामे - नकाशांवर कामाची सद्य:स्थिती व प्रस्तावित कामे दर्शवावीत.

२) मातीकाम व खोदकाम असेल तर किमान २० ते १०० मी. अंतरावर प्रत्यक्ष काटछेद घेऊन सदर संकल्पित काटछेदावर अस्तित्वातील काटछेद दर्शवून प्रस्तावित कामे दर्शवून त्यानुसार मोजमापे परिगणित करावीत.

३) अस्तरीकरण :- कालवा अस्तरीकरणाचे कामाकरिता किमान २० ते १०० मी. अंतरावर प्रत्यक्ष काटछेद घेऊन सदर काटछेद अस्तित्वातील काटछेदावर प्रस्तावित कामे दर्शवून त्यानुसार मोजमापे परिगणित करावीत.

४) CNS Lining हे काळी माती स्तर वर्गीकरण असेल तिथेच व तेवढ्या उंचीचे प्रस्तावित करावेत.

५) धरण व कालवे यांचे मातीकाम प्राधान्याने यांत्रिकी विभागाच्या यंत्र सामग्रीद्वारे प्रस्तावित करावे. यांत्रिकी विभागाकडून यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे शक्य नसेल तरच निविदेद्वारे मातीकाम प्रस्तावित करावे. अधीक्षक अभियंता / मुख्य अभियंता यांनी हा निर्णय घ्यावा.

६) मातीकामामध्ये शक्यतो casing from borrow area चे परिमाण कमीत कमी असावे व from available चा वापर जास्तीतजास्त असावा, याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. धरणाची भराव उंची वाढवायची असल्यास गाभा भरावाचे तलाक तपासून करावे.

७) अपवादात्मक परिस्थितीत Pitching ची कामे करावयाची असल्यास विशिष्ट साखळी क्रमांक नमूद करावा.

८) Toe Drain Pitching अशा स्वरूपाची कामे शक्यतो करु नये.

९) धरण परिसरात कॉक्रीटचे रस्ते प्रस्तावित करु नयेत.

१०) धरणांच्या द्वारांच्या कामांकरीता स्थापत्य व यांत्रिकी विभागातील अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी करून संयुक्त निरिक्षण टिपणी निर्गमित करावी व त्यानुसारच कामे प्रस्तावित करावी.

११) धरणांच्या द्वार दुरूस्तीची तरतूद सविस्तर अंदाजपत्रकावर आधारलेली असावी व द्वार दुरूस्तीसाठी Job Work/ Lump sum तरतूद शक्यतो ठेवू नये, याबाबतची खातरजमा स्थापत्य विभागाच्या अभियंत्यांनीही करावी.

१२) धरण सुरक्षा संघटनेच्या अहवालात नमूद संवर्ग-१ व संवर्ग-२ प्रकारातील त्रुटींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आवश्यक कामे प्राधान्याने अंदाजपत्रकात प्रस्तावित करावीत. याबाबत जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे. Special Attention Deficiencies या प्रकरातील त्रुटी दूर होण्यासाठी उपाययोजना प्राधान्याने कराव्यात.

१३) धरणावरील व कालव्यावरील झाडेझुडपे काढण्याची कामे नियमित देखभाल दुरूस्ती अंतर्गत करण्यात यावीत. धरणावर झाडे झुडपे राहू नयेत याची दक्षता घ्यावी.

१४) अस्तित्वातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे रूपांतर बॅरेज /निम्न पातळी बंधारे यामध्ये रूपांतरीत करण्याची कामे शक्यतो प्रस्तावित करू नयेत. ज्या ठिकाणी अशी कामे प्रस्तावित करण्यात येतात अशा वेळी त्याची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासूनच, योग्य असल्याची खात्री संबंधित अधीक्षक अभियंता / मुख्य अभियंता यांनी करून प्रस्ताव सादर करावा.

१५) अंदाजपत्रक / प्रस्तावासोबत प्रकल्पाचा दर्शक नकाशा, आवश्यक काटछेद, सद्य:स्थिती दर्शविणारी रंगीत छायाचित्रे, मंजूर संकल्पने, व इतर आवश्यक कागदपत्रे जोडली असल्याची खात्री करावी.

१६) प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक सादर करताना सदर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची निरिक्षण टिप्पणी प्रस्तावासोबत जोडली असल्याची खात्री करावी.

१७) देखभाल दुरूस्तीची कामे प्रस्तावित करताना ज्या वितरिका /कालवा / इ.वर ही कामे प्रस्तावित करावयाची आहेत, त्या भागातील सिंचन करून आकारणी तक्ते, देयके देणे इ. कामे बाह्य यंत्रणेने करणे आवश्यक असल्यास त्याच निविदेत प्रस्तावित करावीत. ज्या कालव्यावर सिंचन कर्मचारी कार्यरत नाही, त्यावर बाह्य यंत्रणा लावली जाते. बाह्य यंत्रणेमार्फत सिंचन व्यवस्थापन करावयाचे असल्यास देखभाल दुरूस्ती व सिंचन व्यवस्थापन अशी एकत्रित निविदा काढण्यात यावी व देखभाल दुरस्तीची ३०% रक्कम, आकारणी तक्ते अंतीम होऊन देयके शेतकऱ्यांना दिल्यावर मुक्त करावी, अशी अट टाकावी.

१८) बाह्य यंत्रणेद्वारे कामे करताना पाणीपट्टी आकारून वसुली करण्याचा प्रयत्न करण्यात यावा व प्रत्येक वेळी वसूलपात्र रकमेच्या मर्यादेत सर्व कामे करण्याचा प्रयत्न करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२१०९१६१६०३४८७०२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaijnath Manmathappa Chille

Digitally signed by Vaijnath Manmathappa Chille
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e2bf9216e9c82a387001366ade405f96dced8f883099a0df6eda6dcc4a3cecb0, serialNumber=64cd9fc7921db221846e464a04d2971a520aa1ed7e728a92a64c735ef2ea7cc9, cn=Vaijnath Manmathappa Chille
Date: 2021.09.16 16:05:15 +05'30'

**( वैजनाथ चिल्ले )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.

३. मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

४. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

५. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.

६. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव
९. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
१०.सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
११.महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२.महालेखापाल १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य मुंबई / नागपूर.
१३.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.प्रधान सचिव , नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.प्रधान सचिव (जसंप्र व वि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.सचिव (जसंव्य व लाक्षेवि) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महासंचालक, मेरी नाशिक,
१९.सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग
२०.मुख्य लेखा परीक्षक, जल व सिंचन, वाल्मी, औरंगाबाद
२१.मुख्य अभियंता (पा) व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२२.मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक
२३.सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग
२४.अधिक्षक अभियंता, राज्य तांत्रिक सल्लागार समिती क्र.१/२, नाशिक/पुणे.
२५.अधिक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक,
२६.सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग
२७.सर्व कार्यकारी अभियंते, जलसंपदा विभाग
२८. सर्व तांत्रिक कार्यासन, जलसंपदा विभाग
२९.निवडनस्ती.